# जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक १५ नोव्हेंबर २०१८

## कार्यवृत्त भाग १

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकारी व अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|
| दिनांक १५.११.२०१८<br>वेळ सकाळी ११.०० वा. | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक १५.११.२०१८ ला सकाळी ११.०० वाजता मा. श्रीमती सिमाताई मडावी, अध्यक्षा, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आली. सभेला विषय समितीचे सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य जिल्हा परिषद, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) तथा सचिव स्थायी समिती, जिल्हा परिषद व इतर खात्याचे विभाग प्रमुख, खंड विकास अधिकारी, उपविभागीय अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

**विषय क्रमांक १ :- मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक १ :-** सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे व सन्मा. सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी मागील सभेचे कार्यवृत्त उशीरा मिळाल्यामूळे नाराजी व्यक्त केली. तसेच मागील कार्यवृत्तावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, फक्त देवरी, सालेकसा व अ/मोरगांव तालुका दुष्काळग्रस्त घोषीत करण्यात आलेले आहे. उर्वरीत ५ तालुक्यांना का वगळण्यात आले याबाबत प्रश्न उपस्थित केला. तिरोडा, गोंदिया व गोरेगांव तालुके मागील वर्षी दुष्काळग्रस्त घोषीत करण्यात आले होते. फक्त तिनच तालुक्यांचा विचार करण्यात येत आहे. इतर तालुक्यांचा विचार का करण्यात आला नाही याबाबत शासनास कळविण्याचे मत व्यक्त केले. तसेच दिनांक १६.१०.२०१८ च्या स्थायी समिती सभेत मागील सभेचे कार्यवृत्त कायम करीत असतांना त्यात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची मागणी केली. "दिनांक ५.८.२०१८ व दिनांक ६.८.२०१८ ला आमगांव तालुक्यातील ग्रामपंचायत मधील साहित्याचे देयक देण्यात यावे असे सुचविले होते. चौकशी करावी हा शब्दप्रयोग वगळून त्याऐवजी ग्रामपंचायतीला प्राप्त झालेले साहित्याचे देयके वितरीत करावे व ज्यांचे FTO मारले आहे, त्यांचे निधी देण्यात यावे असे वाचावे". यावर मा. सभाध्यक्ष महोदया यांनी सदस्यांनी सुचविल्यानुसार कार्यवृत्तात बदल करुन आजच्या कार्यवृत्तात नोंद घेण्याची सुचना केली.

मुद्या क्रमांक १६ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, गोरेगांव तालुक्यातील हिरापूर ग्रामपंचायत येथील रोजगार सेवकाला संधी न देता कमी करण्यात आलेले आहे. सदर रोजगार सेवकाला एक संधी देण्याची मागणी केली. अनुपालनात दिनांक १२.७.२०१८ ला गट विकास अधिकारी यांना पत्र दिल्याचे अनुमालनात नमुद आहे. मात्र कार्यवाही

काहीही झालेली नाही. ग्रामपंचायत हिरापूर येथील सरपंच व सचिव हे दोषी असतांनाही त्यांचेवर कार्यवाही करण्यास विलंब का होत आहे? याबाबत विचारणा केली.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, जवळी येथील कामाला न्यायालयाने स्थगीती दिलेली आहे. ग्रामपंचायतीने ठराव केलेला असला तरीही शासन निर्णयाप्रमाणे कामाची जागा बदलल्यास रद्य करण्याचे अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत असे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, झांजीया येथील श्री नैकाने यांचेवर आर्थिक अफरातफरी केल्याबाबत ६ महिन्यापासून वसुलीची कार्यवाही प्रलंबीत आहे. यावर गट विकास अधिकारी, गोरेगांव यांनी पुढील आठवडयात FIR करण्याची कार्यवाही व वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात येईल याबाबत माहिती दिली.

सन्मा. सभापती श्री विश्वजीत डोंगरे यांनी मनरेगा अंतर्गत वैयक्तीक लाभार्थीना निधी कसा देण्यात येईल याबाबत विचारणा केली. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी शासन निर्णयानुसार लाभार्थी यांचे खात्यात निधी जमा करता येईल असे सांगितले. यावर उप मुकाअ (मनरेगा) यांनी शासन निर्णयानुसार लाभार्थी यांचे खात्यात निधी जमा करता येऊ शकत असल्याची माहिती दिली.

सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे व सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी इर्री ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार सेवकाची निवड करण्याबाबतचा मुद्या प्रलंबीत असल्याचे अवगत केले. यावर उप मुकाअ (मनरेगा) यांनी रोजगार सेवकाची निवड करण्याबाबतचे अधिकार ग्रामसभेला असल्याचे सांगितले. यावर सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी ग्रामसभेने चुकीची कार्यवाही केल्यामूळे सदर प्रकरण मा. आयुक्तांकडे गेले असल्याची माहिती दिली. मा. आयुक्त यांनी सदर प्रकरण जिल्हा परिषदे अंतर्गतच निपटारा करणे आवश्यक असल्यामूळे प्रकरण परत केलेले आहे. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी उप मुकाअ (पंचायत) यांचे दिनांक २९.१.२०१८ चे पत्रानुसार गट विकास अधिकारी यांना त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देशीत केले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी श्री महादेव कटरे या शेतकऱ्याने महाबिज (सहयाद्री) कडून वाण घेतल्यानंतर त्यांचे शेतात रोपे आली, परंतू उत्पादन काहीही झालेले नाही. त्यामूळे सदर कृषी केंद्रावर कार्यवाही केली काय? याबाबत विचारणा केली व याबाबत शासनाला कळवून सदर शेतकऱ्याला होणाऱ्या अपेक्षित उत्पादनाएवढी नुकसान भरपाई शासनाकडून मिळवून देण्याची मागणी केली. यावर कृषी विभागाने सदर प्रकरणाची चौकशी झाली असल्याची माहिती दिली.

मुद्या क्रमांक १ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, समाज कल्याण अंतर्गत बृहत आराखडा तयार करण्याकरीता दिनांक ३०.६.२०१८ पर्यंत अहवाल मागविण्यात आले होते. अहवाल तयार केल्यानंतर समाजकल्याण विभागातील अधिकारी/कर्मचारी प्रस्ताव घेण्यास तयार नाही. अधिकारी प्रस्ताव परत करतात ही बाब अत्यंत चुकीची आहे. जे प्रस्ताव

प्राप्त होतात त्यांनाच मंजूरी देण्यात यावी. यावर समाज कल्याण अधिकारी यांनी जे प्रस्ताव प्राप्त होतील त्यांनाच मंजूरी देण्यात येईल याबाबत आश्वस्त केले.

सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी जि.प.सदस्यांनी सभागृहात विचारलेली माहिती मिळत नसल्यामूळे तिव्र नाराजी व्यक्त केली. वैयक्तीक लाभार्थी यांना लाभ मिळालेला नाही. शिलाई मशीन, सायकल वाटप यादी अजुनही प्राप्त झालेली नाही. गरजू लाभार्थी यांना वर्षानुवर्षे लाभ मिळत नसल्यामूळेही नाराजी व्यक्त केली. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्रीमती रचनाताई गहाणे यांनीही जि.प. सदस्यांनी गरजू लाभार्थ्यांची नांवे दिल्यानंतरही अंतीम यादीतून नांवे वगळण्यात येतात. समाजकल्याण व बालकल्याण विभागाच्या वैयक्तीक लाभाची यादी सभागृहात सादर करण्याची मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी आपले सेवा सरकार अंतर्गत डुग्गीपार व परसोडी येथे मानधन मिळाले नसल्याचे अवगत केले. यावर उप मुकाअ (पंचायत) यांनी ग्रामपंचायतीने approved करणे आवश्यक असून Approved झाल्यानंतर लगेचच मानधन देण्यात येणार असल्याची माहिती दिली.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी तंटामुक्त समितीत गावातील जवळपास ९५ टक्के तंटे सुटत असल्याचे निदर्शनास आणून दिले. सौदंड ग्रामपंचायत मधील सचिवाने "मी असेपर्यंत तंटामुक्त समितीतील सदस्यांची निवड होणार नाही" असे सांगितले आहे. तसेच सचिवाचे नाकर्तेपणामूळे ग्रामपंचायतीचा निधीही परत गेलेला आहे. ई-निविदा मध्येही घोळ केलेला आहे. सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली.

सन्मा. उपाध्यक्ष श्री हमीद अल्ताफ अकबरअली यांनी १४ वा वित्त आयोगाचा निधी बराचशा ग्रामपंचायतीमध्ये शिल्लक असल्याचे निदर्शनास आणून देवून सदर निधी परत मागवून विकास कामात खर्ची करण्याचे मत व्यक्त केले.

मुद्या क्रमांक २६ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, निंबा येथील शाळेत श्रीमती वासनिक यांची तात्पुरती नियुक्ती केली होती. परंतू सदर शिक्षीका रुजू झाल्यानंतर लगेचच रजेवर निघून गेल्यात. सदर प्रकरणात खंड विकास अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याबाबत विचारणा केली. यावर खंड विकास अधिकारी यांनी सदर शिक्षीका रजेवरुन परत आल्यानंतर रुजू झाल्याची माहिती दिली. यावर सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी सदर शिक्षीका दिनांक १३.११.२०१८ पर्यंत रुजू झाल्या नसल्याचे सांगितले.

मुद्या क्रमांक ७ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी तिरोडा येथील शिक्षकावर ३५४ अन्वये गुन्हा दाखल होवुनही कार्यवाही झालेली नाही यावर नाराजी व्यक्त केली. यावर सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनी मा. सभाध्यक्ष यांचे वतीने विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात येत असल्याबाबत सांगितले.

सन्मा. सदस्य श्री शोभीलाल कटरे यांनी शिवणी शाळेत एकही महिला शिक्षक नसल्याबाबत अवगत करुन महिला शिक्षक देण्याची मागणी केली.

मुद्या क्रमांक ८ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी बालकल्याण विभागा मार्फत ज्या लाभार्थ्यांना लाभ दिलेला होता त्यांच्या खात्यात अजुनही निधी जमा झाले नसल्याचे अवगत केले. यावर श्री टेंभुर्णेकर, अधिक्षक यांनी लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा करण्याकरीता धनादेश बँकेत जमा केल्याचे सांगितले.

मुद्या क्रमांक १३ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटांचा माहे नोव्हेंबर २०१७ अगोदरचा निधी कधी पर्यंत मिळणार याबाबत विचारणा केली. सदर महिलांनी आपले दागिने विकून आहार पुरवठा केल्याचे अवगत करुन निधी त्वरीत देण्याची मागणी केली.

मुद्या क्रमांक २४ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र सुकडी येथिल कॅमेरे बंद असल्याबाबत मागील सभेत अवगत केले होते, परंतू कार्यवाही न झाल्यामूळे नाराजी व्यक्त केली. यावर आरोग्य अधिकारी यांनी माहिती दिली की, कंत्राटदार यांनी सुकडी येथील बंद कॅमेऱ्याची तपासणी केलेली असून ३ दिवसांत सुरु करण्यात येईल.

**विषय क्रमांक २:- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**ठराव क्रमांक २:-** आरोग्य विभागा अंतर्गत गोवर-रुबेला लसीकरण शासन निर्णयाचे वाचन करण्यात आले.

**विषय क्रमांक ३:- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**विषय क्रमांक ३/१ :- सन २०१८-१९ करीता प्रसिद्ध राज्य दरसुचीस (SSR) ला मान्यता प्रदान करण्याबाबद.**

**ठराव क्रमांक ३/१ :-** सदर विषयावर चर्चा करुन सन २०१८-१९ करीता प्रसिद्ध राज्य दरसुचीस (SSR) ला सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक ३/२ :-** सन २०१८-१९ करीता ३०५४ जिल्हा वार्षिक योजना बिगर आदीवासी ग्रामिण मार्ग, ५०५४ जिल्हा वार्षिक योजना इतर जिल्हा मार्ग विकास मजबुतीकरण कामांचे नियोजनाबाबत.

**ठराव क्रमांक ३/२ :-** सदर विषयावर चर्चा करुन सन २०१८-१९ करीता ३०५४ जिल्हा वार्षिक योजना बिगर आदीवासी ग्रामिण मार्ग, ५०५४ जिल्हा वार्षिक योजना इतर जिल्हा मार्ग विकास मजबुतीकरण कामांचे नियोजनाबाबत.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**यांव्यतिरीक्त सभेत करण्यात आलेली चर्चा.**

१) सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी अवगत केले की, फार जुनी इलेक्ट्रीक तार लाईन असल्यामूळे महिलेच्या अंगावर तार पडल्याने महिलेचा जागीच मृत्यू झालेला आहे. बऱ्याच ठिकाणी अशा जुन्या तार लाईन खाली लोंबत असल्यामूळे अशा प्रकारच्या आणखी घटना होऊ

शकतात. त्यामूळे अशा तारांची दुरुस्ती करण्याकरीता वेगळयाने निधी मागणी करण्याचे मत व्यक्त केले.

२) सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी झांसीनगर ता. अ/मोरगांव येथील नागरीकांनी ३-४ वर्षापुर्वी डिमांड भरल्यानंतरही इलेक्ट्रीक कनेक्शन आलेले नसल्याचे अवगत केले. त्वरीत कनेक्शन देण्याची मागणी केली.

३) सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी शाळेवरुन जाणाऱ्या इलेक्ट्रीक तार काढण्याबाबत कार्यवाही करण्याकरीता अवगत केले.

४) सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, श्रीमती अहिरकर, कंत्राटी नर्स यांनी श्री महादेव लिलाधर शेंडे रुग्णालयात आले असता त्यांचेशी गैरवर्तवणुक केली. तसेच गोवर लस देण्याऐवजी दुसरीच लस दिली. अशा असभ्य व निष्काळजपणे काम करणाऱ्या नर्स वर कारवाई करण्याची मागणी केली.

५) पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घेतल्या गेलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या दिनांक २६.४.२०१८ च्या यादीत श्री नरेंद्र पटले यांचे नांव होते. परंतू दिनांक ८.६.२०१८ च्या लागलेल्या यादीत श्री नरेंद्र पटले यांचे नाव वगळण्यात आले आहे. श्री नरेंद्र पटले यांना डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर घेण्याची मागणी सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी केली. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची नियुक्ती NGO मार्फत होत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

६) सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, रमाई आवास योजने अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये कट्टीपार येथील २९ लाभार्थ्यांची यादी सादर झालेली होती. परंतू यादी आजही मंजूरी झालेली नाही. यादी मंजूर न होण्याचे कारण काय? याबाबत विचारणा केली. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गोंदिया जिल्हयाला फक्त ३००० चे उद्यिष्ट प्राप्त झालेले असून सन २०१७-१८ किंवा २०१८-१९ मध्ये सदर लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल. सदर २९ लाभार्थी यांचेकडे जात प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्र असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

७) तिरोडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची संख्या कमी असून सुकळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर व नर्स नसल्याचे सन्मा. सदस्या श्रीमती रजनी कुंभरे यांनी निदर्शनास आणून दिले. रात्रीच्या वेळेस रुग्ण आल्यास डॉक्टर नसल्यामूळे रुग्णांच्या नातेवाईकांची तारांबळ होते. तसेच एकच डॉक्टर असल्यास २४ तास सेवा देणे शक्य होत नाही. करीता प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात ३ डॉक्टर देण्याची मागणी केली.

८) सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी अवगत केले की, धाबेपवनी/तिडका, ता. अ/मोरगांव करीता पाईपची मागणी केलेली होती परंतू मागणी अजुनही पुर्ण झालेली नाही. त्याचप्रमाणे तालुक्यातील इतरही ठिकाणी पाईपची मागणी पुर्ण करण्याकरीता आजपासून कार्यवाही केल्यास वेळेवर पाईप पुरविणे शक्य होईल.

९) तालुक्यात झालेली वृक्षलागवड, त्यावरील खर्च व त्यांकी किती झाडे जगली याप्रकारची सविस्तर माहिती ग्रामपंचायती मार्फत घेऊन सादर करण्यास सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी मागणी केली. वृक्ष लागवड झाल्यानंतर झाडे जिवंत राहत नाही, यामध्ये मोठा भ्रष्टाचार होण्याचीशक्यता असल्याचे सांगितले.

१०) जिल्हा परिषद परिसरातील उपहागृहाकरीता रु. ३.०० लक्ष मंजूर करुन एक अतिरीक्त रुम जि.प.सदस्यांकरीता तयार करण्याकरीता सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सुचविले. यास सन्मा. सभापती श्री हमीद अल्ताफ अकबर अली यांनी या निर्णयाचे स्वागत केले. तसेच सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सध्याचे पुरवठाधारक यांचा नास्ता व सेवा उत्तम असल्यामूळे १०% रक्कम वाढवून त्याच पुरवठाधारकास कंत्राट देण्याचे मत व्यक्त केले. यास मा. अध्यक्ष महोदया यांनी दुजोरा दिला.

**विषय क्रमांक ४ :-** स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (३) नुसार कायम करणे.

**ठराव क्रमांक ४ :-** स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (३) नुसार कायम करण्यात आले.

| | |
|---|---|
| स्वा/- | Smadavi |
| **सचिव** | **सभापती** |
| स्थायी समिती सभा तथा | स्थायी समिती तथा अध्यक्ष |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) | जिल्हा परिषद, गोंदिया |
| जिल्हा परिषद, गोंदिया | |

## जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक १५ नोव्हेंबर २०१८
## कार्यवृत्त भाग २

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकारी व अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|
| दिनांक १५.११.२०१८<br>वेळ सकाळी ११.०० वा. | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

**विषय क्रमांक १:- मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक १:-** दिनांक १६.१०.२०१८ ला झालेल्या सभेच्या कार्यवृत्तावर चर्चा करुन कार्यवृत्त सर्वानूमते मंजूर करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २:- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**ठराव क्रमांक २:-** आरोग्य विभागा अंतर्गत गोवर-रुबेला लसीकरणाबाबतचे शासन निर्णयाचे वाचन करण्यात आले.

**विषय क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**विषय क्रमांक ३/१ :- सन २०१८-१९ करीता प्रसिद्ध राज्य दरसुचीस (SSR) ला मान्यता प्रदान करण्याबाबद.**

**ठराव क्रमांक ३/१:-** सन २०१८-१९ च्या जि.प. बांधकाम विभागातील विविध कामांना दि. १९.९.२०१८ पासुन नविन राज्य दर सुची लागु करण्याकरीता शासन निर्णय क्रमांक रादसु-२०१८/प्र.क्र.-२७/नियोजन-३ मंत्रालय मुंबई नुसार सुचना प्राप्त आहे. त्यानुसार जि.प. बांधकाम विभागातील विविध कामांना दिनांक १९.९.२०१८ पासून नविन राज्य दरसुची लागु करण्याकरीता सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक ३/२ :- सन २०१८-१९ करीता ३०५४ जिल्हा वार्षिक योजना बिगर आदीवासी ग्रामिण मार्ग, ५०५४ जिल्हा वार्षिक योजना इतर जिल्हा मार्ग विकास मजबुतीकरण कामांचे नियोजनाबाबत.**

**ठराव क्रमांक ३/२ :-** सन २०१८-१९ करीता ३०५४ जिल्हा वार्षिक योजना बिगर आदीवासी ग्रामिण मार्ग, ५०५४ जिल्हा वार्षिक योजना इतर जिल्हा मार्ग विकास मजबुतीकरण कामांचे अंतर्गत जिल्हा वार्षीक योजना ३०५४ ग्रामा सर्वसाधारण रु. ६१९.७० लक्षचे व जिल्हा वार्षिक योजना ५०५४ इजिमा सर्वसाधारण रु. ७२४.९३ लक्षचे कामांच्या निधीला व आराखडयाला जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये सादर करण्यासाठी सुधारीत यादीस सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक ४ :- स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्रमांक ४ :-** स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सचिव**
स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गोंदिया

**सभापती**
स्थायी समिती तथा अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया